**प्रेसनोट**

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./पोउआ/वाह/4962/२०२३ — पुणे दिनांक - 10/०७/२०२३

पुणे शहरातील येरवडा वाहूतक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **शास्त्रीनगर चौकातील सह्याद्री हॉस्पीटल लेन येथुन बदामी चौक, जुना एअर पोर्ट रोड येथे जाणारी व एअरपोर्ट रोडवरील बदामी चौक येथून सह्याद्री हॉस्पीटल लेन मार्गे नगर रोडकडे जाणाऱ्या जड वाहनांचे वाहतूकीस बंदी करण्यात येत आहे.**

पर्यायी रस्ता –

**१)शास्त्रीनगर चौक सरळ गोल्फ चौक, उजवीकडे वळुन एअरपोर्ट रोडने बदामी चौक पुढे इच्छितस्थळी**
**२) बदामी चौक सरळ गोल्फ क्लब चौक डावीकडे वळण घेवुनशास्त्री नगर चौक पुढे इच्छितस्थळी**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक –१०/०७/२०२३ ते दिनांक– २५/०७/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर